मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 17 ऑगस्ट 2025 | पान- 1

# महानगरपालिकेच्या वतीने स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

## हर घर तिरंगा, हर घर स्वच्छता अभियानांतर्गत महापालिकेकडून भव्य बाईक रॅलीचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारताच्या स्वातंत्र्य दिनाचा ७८ वा वर्धापन दिन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, यावेळी उपस्थितांना आयुक्त शेखर सिंह यांनी शुभेच्छा दिल्या.



आयुक्त सिंह म्हणाले, भारतीय स्वातंत्र्याला ७८ वर्षे पूर्ण झाली. स्वातंत्र्याचा उत्सव आपण घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबवून आनंदाने साजरा करत आहोत. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणाऱ्या सर्व महान व्यक्तींच्या त्यागाचे स्मरण करण्याचा आजचा दिवस आहे. आपल्या देशाच्या इतिहासाची सुवर्ण पाने आपल्याला सतत प्रेरणा देत राहतील. सर्वप्रथम मी सर्व शहरवासियांना भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त खूप खूप शुभेच्छा देतो.

शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पिंपरी चिंचवड महापालिका कटिबद्ध आहे. स्वच्छता, आरोग्य, पायाभूत सुविधा, ई-प्रशासन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील यशस्वी उपक्रमांमुळे आपले शहर देशभरात वेगळा ठसा उमटवत आहे. आगामी काळात देशाच्या जडणघडणीत आणि सर्वांगीण विकासामध्ये आपल्या शहराचे मोठे योगदान असेल, असा मला दृढ विश्वास आहे, असेही आयुक्त शेखर सिंह म्हणाले.

या राष्ट्रध्वजारोहण कार्यक्रमास आमदार उमा खापरे, माजी महापौर योगेश बहल, माजी उपमहापौर राजू मिसाळ, माजी नगरसदस्य गोविंद पानसरे,नामदेव ढाके, जितेंद्र ननावरे,अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील,तृप्ती सांडभोर,शहर अभियंता मकरंद निकम,मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले,सह आयुक्त मनोज लोणकर,आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.लक्ष्मण गोफणे, डॉ.अभयचंद्र दादेवार, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, सह शहर अभियंता बापूसाहेब गायकवाड,देवन्ना गट्टूवार,अनिल भालसाखळे,उप आयुक्त राजेश आगळे,अण्णा बोदडे, पंकज पाटील, प्रदीप ठेंगल,ममता शिंदे,मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे,मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल,अग्निशमन अधिकारी ऋषिकेश चिपाडे,विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागातील अधिकारी,आपदा मित्र प्रमुख संतोष शेलार आणि ३० आपदा सहकारी,विविध विभागांचे प्रमुख,सामाजिक कार्यकर्ते,कर्मचारी आणि शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थी विकसित भारताचे भविष्य : आमदार शंकर जगताप

## सचिन साठे सोशल फाऊंडेशन तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न; उपक्रमाचे 21वे वर्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र करण्याचा संकल्प केला आहे. आजचे पुरस्कार प्राप्त विद्यार्थी हे उद्याच्या विकसित भारताचे भविष्य आहे. गेल्या २१ वर्षांपासून पिंपळे निलख येथील सचिन साठे सोशल फाऊंडेशन विद्यार्थ्यांचा व समाजातील मान्यवरांचा गुणगौरव करून समाजासाठी प्रेरणादायी उपक्रम राबवीत असून ही अभिमानास्पद बाब आहे, असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले.




सचिन साठे सोशल फाऊंडेशनतर्फे इयत्ता दहावी, बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या मान्यवरांचा सत्कार समारंभ शुक्रवारी (१५ ऑगस्ट) उत्साहात पार पडला. यावेळी भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, माजी आमदार अश्विन जगताप, प्रा. गणेश शिंदे आदी उपस्थित होते.

इयत्ता दहावी बारावी मध्ये विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तसेच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचे कौतुक केले पाहिजे. या आदर्श विद्यार्थी, व्यक्तीमुळे इतरांना प्रेरणा मिळते. म्हणून हा गौरव समारंभ आयोजित केला जातो, असे सचिन साठे म्हणाले.

### पुरस्कारार्थी खालील प्रमाणे -

» स्व. आमदार लक्ष्मणभाऊ जगताप स्मृती पुरस्कार (इयत्ता बारावी प्रथम क्रमांक – रू. १५,५५५ रोख व सन्मानचिन्ह) वरद मनीष गुप्ता तर , स्व. सुरज काळूराम नांदगुडे स्मृती पुरस्कार (इयत्ता दहावी प्रथम क्रमांक – रू ११,१११ रोख व सन्मानचिन्ह) अवनी सचिन गुंड हिला प्रदान करण्यात आला. तसेच ८५% पेक्षा जास्त गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच, सन्मानचिन्ह आणि स्कूल बॅग प्रदान करण्यात आली. तर इयत्ता दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व स्कूल बॅग देऊन गौरव करण्यात आला.

शत्रुघ्न काटे म्हणाले, हा गुणगौरव सोहळा विद्यार्थ्यांच्या प्रगतीला प्रोत्साहन देणारा आणि समाजात सकारात्मकतेचा संदेश देणारा आहे. विद्यार्थ्यांनी चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर हे यश संपादन केलेले आहे. त्यासाठी काटेकोर मेहनत, वेळेचे नियोजन ही विद्यार्थ्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान हा त्यांच्यासाठी मोठी प्रेरणा असून, मला या सोहळ्याचा एक भाग होता आले याचा आनंद आहे, असे श्रेया बुगडे म्हणाल्या.

# पवनामाईचे खासदार बारणे यांच्या हस्ते जलपूजन

## पिंपरी-चिंचवडसह मावळवासीयांची तहान भागविणारे पवना धरण 95 टक्के भरले



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडसह मावळवासीयांची तहान भागविणारे पवना धरण ९५ टक्के भरले आहे. मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते आज (शनिवारी) जलपूजन करण्यात आले. वर्षभर पुरेल एवढे पाणी धरणात असून शहरवासीयांची वर्षभराची पाण्याची चिंता मिटली आहे. धरणातील गाळ काढल्याने पाणी साठवण क्षमता वाढल्याचे खासदार बारणे म्हणाले.

यावेळी पवना धरणाचे शाखा अभियंता रजनीश बारिया, शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, माजी सभापती ज्ञानेश्वर दळवी, संत तुकाराम सहकार साखर कारखान्याचे संचालक लक्ष्मण भालेराव, कांता रसाळ, शिवसेना तालुका प्रमुख राजाभाऊ खांडभोर, उपतालुका प्रमुख राम सावंत, चंद्रकांत भोते, धनंजय नवघने, अमित कुंभार, युवासेना मावळ लोकसभा अध्यक्ष विशाल हुलावळे, शिवसेना सोशल मीडिया जिल्हाप्रमुख सुदर्शन देसले, तळेगाव शिवसेना शहर प्रमुख देव खरटमल, नवनाथ हरपुडे, प्रवीण ढोरे, मदन शेडगे व मोठ्या संख्येने ग्रामस्त उपस्थित होते.

पवना धरणातून पिंपरी-चिंचवड शहरवासीयांना पाणीपुरवठा केला जातो. ६ एमएलडीपेक्षा अधिकचे पाणी शहरास पाणीपुरवठा करण्यासाठी वापरले जाते. शहराचा पाणी पुरवठ्याचे पवना धरण मुख्य स्त्रोत आहे. धरणातील पाण्याची क्षमता वाढण्यासाठी मागील अनेक वर्षांपासून खासदार श्रीरंग बारणे यांच्यावतीने धरणातील गाळ काढला जातो. त्यामुळे धरणातील साठवण क्षमता वाढली. गाळ काढल्यामुळे पाणीसाठा अधिकचा राहत आहे. यामुळे पिंपरी-चिंचवडकरांवरील पाणीसंकट टळले. काही वर्षांपूर्वी दोन दिवसाआड पाणी मिळत होते. परंतु, गाळ काढल्यामुळे धरणातील साठवण क्षमता वाढली असून शहरवासीयांना तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत नाही.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, "मागील आठ वर्षांपासून धरणातील ८५ हजार क्युबिक मीटर गाळ काढला आहे. त्यामुळे धरणातील पाणी साठवण क्षमता वाढली आहे. पवना धरणात ९५ टक्के पाणीसाठा आहे. वर्षभर पुरेल एवढे पाणी धरणात आहे. पवना नदी सुधार प्रकल्प राबविण्यासाठी पाठपुरावा केला. त्याला यश आले आहे. पीएमआरडीए आणि पिंपरी-चिंचवड महापालिका नदी सुधार प्रकल्प राबविणार आहे. नदी स्वच्छ रहावी, नदी काठच्या गावात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारले जाणार आहेत. त्यामुळे नदी पात्रात अशुद्ध पाणी जाणार नाही. नागरिकांना आणखी शुद्ध पाणी मिळेल. महापालिकेचा पाणी शुद्धीकरण करण्याचा खर्च कमी होईल."

# पिंपरी-चिंचवडच्या पाणीपुरवठा सक्षमीकरणासाठी आता "ॲक्शन प्लॅन"

## पाणीपुरवठ्याची गरज आणि उपायोजनाबाबत बैठक घ्या; आमदार महेश लांडगे यांची मागणी





महेश किसनराव लांडगे
आमदार भाजपा, पिंपरी-चिंचवड.

जा.क्र. : 2672 | दिनांक : 16 / 08 / 2025

प्रति,
**मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब,**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

**विषय : पिंपरी-चिंचवड शहराचा पाणीपुरवठा वाढती गरज आणि उपाययोजना याबाबत आढावा बैठक नियोजित करणेबाबत विनंती.**

महोदय,

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सध्या ३५ लाखांच्या घरात आहे. २०५१ मधील शहराची लोकसंख्या सुमारे १ कोटीच्या घरात राहील. त्यानुसार शहराला किमान ८०० एमएलडी पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता आहे. परिणामी, पाणी पुरवठा नवीन जलस्त्रोत निर्मिती आणि सुरू असलेल्या योजना सक्षमपणे राबवण्याची आवश्यकता आहे.

सध्यस्थितीला शहरासाठी पवना, आंद्रा, भामा आसखेड धरणातून पाणी उपलब्ध होते. पवना बंद जलवाहिनी प्रकल्पावरील 'जैसे थे' आदेश उठवण्यात आला आहे. मात्र, अद्याप काम सुरू झालेले नाही. आंद्रा धरणातून १०० एमएलडी पाण्याचा पुरवठा सुरू झाला आहे. भामा आसखेड प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सदरचे काम गतीमान करण्याची आवश्यकता आहे. दरम्यान, वाढती लोकसंख्या आणि शहराची गरज लक्षात घेता चासकमान, ठोकरवाडी आणि मुळशी धरणातून शहरासाठी पाणी आरक्षीत करण्याबाबत राज्य सरकारकडे प्रस्ताव आहे. शहरातील वाढत्या गृहनिर्माण सोसायटींमध्ये पाणी पुरवठा बाबत तक्रारी निर्माण होत आहे.

त्या अनुशंगाने नवीन जलस्त्रोतांबाबत प्रशासनाची तयारी, सुरू असलेले पवना बंद जलवाहिनी आणि आंद्रा-भामा-आसखेड प्रकल्पाच्या कामाला गती देणे आणि शहराचा पाणी पुरवठा सक्षम करणे याबाबत मा. जलसंपदा मंत्री, मा. नगरविकास मंत्री यांच्यासह संबंधित विभागाचे मंत्री महोदय आणि उच्चाधिकारी यांची आढावा बैठक आपल्या अध्यक्षतेखाली नियोजित करावी, अशी विनंती आहे.

धन्यवाद!

आपला स्नेहांकीत,
**महेश किसनराव लांडगे**
आमदार, भोसरी विधानसभा,
भाजपा, पिंपरी- चिंचवड पुणे.

मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय : शितलबाग कॉम्प्लेक्स, तुळजा भवानी मंदिरामागे, पुणे–नाशिक रोड, भोसरी, पुणे–४११०३९
93 79 909090 (24x7 हेल्पलाईन सेवा)
landge.mahesh.k@gmail.com
www.maheshlandge.in

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सध्या ३५ लाखांच्या घरात आहे. २०५१ मधील शहराची लोकसंख्या सुमारे १ कोटीच्या घरात राहील. त्यानुसार शहराला किमान ८०० एमएलडी पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता आहे. परिणामी, पाणी पुरवठा नवीन जलस्त्रोत निर्मिती आणि सुरू असलेल्या योजना सक्षमपणे राबवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी संबंधित विभागाचे मंत्री महोदय आणि प्रमुख अधिकारी यांची आढावा बैठक घ्यावी आणि 'ॲक्शन प्लॅन' तयार करावा, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, सध्यस्थितीला शहरासाठी पवना, आंद्रा, भामा आसखेड धरणातून पाणी उपलब्ध होते. पवना बंद जलवाहिनी प्रकल्पावरील 'जैसे थे' आदेश उठवण्यात आला आहे. मात्र, अद्याप काम सुरू झालेले नाही. आंद्रा धरणातून १०० एमएलडी पाण्याचा पुरवठा सुरू झाला आहे. भामा आसखेड प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सदरचे काम गतीमान करण्याची आवश्यकता आहे.

दरम्यान, वाढती लोकसंख्या आणि शहराची गरज लक्षात घेता चासकमान, ठोकरवाडी आणि मुळशी धरणातून शहरासाठी पाणी आरक्षीत करण्याबाबत राज्य सरकारकडे प्रस्ताव आहे. शहरातील वाढत्या गृहनिर्माण सोसायटींमध्ये पाणी पुरवठा बाबत तक्रारी निर्माण होत आहे.

त्या अनुशंगाने नवीन जलस्त्रोतांबाबत प्रशासनाची तयारी, सुरू असलेले पवना बंद जलवाहिनी आणि आंद्रा-भामा-आसखेड प्रकल्पाच्या कामाला गती देणे आणि शहराचा पाणी पुरवठा सक्षम करणे याबाबत मा. जलसंपदा मंत्री, मा. नगरविकास मंत्री यांच्यासह संबंधित विभागाचे मंत्री महोदय आणि उच्चाधिकारी यांची आढावा बैठक आपल्या अध्यक्षतेखाली नियोजित करावी, अशी विनंतीही आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे केली आहे.

> पिंपरी-चिंचवड शहराची वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि भविष्यातील पाणी गरजा लक्षात घेता, जलस्रोतांची नियोजनबद्ध वाढ आणि सुरू असलेल्या पाणी प्रकल्पांना गती देणे अत्यंत गरजेचे आहे. नागरिकांना शाश्वत आणि पुरेसा पाणी पुरवठा मिळावा यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच आढावा बैठक घेतली जाईल. शहरासाठी आवश्यक निर्णय वेळीच घेतले जातील, यासाठी मी कटिबद्ध आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# आळंदीत माऊलींच्या मंदिरावर सुवर्ण कलशारोहण

## राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या कलशाचे पूजन करण्यात आले

**पुणे | प्रतिनिधी**

कैवल्यसाम्राज्य चक्रवर्ती संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त शुक्रवारी (दि. १५) आळंदी येथील संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर शिखरावर २२ किलो वजनाचा व सुमारे २२ कोटी रुपयांचा सुवर्ण कळस बसविण्यात आला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या कलशाचे पूजन करण्यात आले. तपस्वी वारकरी शांतीब्रम्ह मारुती बाबा कुऱ्हेकर, ह.भ.प.डॉ. नारायण महाराज जाधव यांच्या हस्ते हे कलशारोहन करण्यात आले. तत्पूर्वी देऊळवाड्याच्या महाद्वाराच्या जिर्णोध्दार कामाचा शुभारंभ पूजन करत करण्यात आला.





याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी माऊलींच्या संतकार्याचा गौरव करत त्यांच्या मंदिरावर सुवर्णकलश बसविण्यात आला ही अभिमानाची गोष्ट असल्याचे सांगितले. आमच्या मात्या-पित्यांनी चांगली कामे केली असतील म्हणून या ठिकाणी येण्याचे या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्याचे भाग्य लाभले असेही त्यांनी सांगितले. महादजी शिंदे यांच्या पराक्रमाचे दाखले देत त्यांनी माऊलींच्या मंदिर उभारणीत दिलेले योगदान त्यांनी अधोरेखित केले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी देखील या सुवर्ण कलशासाठी दान देत समर्पण केले याचही त्यांनी कौतुक केले. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या भाषणात भावनिक मुद्द्यांना हात घालत एक काळ असा होता की माऊलींच्या आणि त्यांच्या या भावंडांच्या तोंडात अन्नाचा घास नव्हता. आज त्याच माऊलींच्या मंदिरावर सोन्याचा कळस आहे, ही किती भावनेची आणि श्रद्धेची बाब असल्याचे म्हटले. आळंदी देवस्थानच्या विविध उपक्रमासाठी आम्ही कायमच मदत करत आलो असून येत्या काळात देखील देवस्थानच्या प्रकल्पाला निधी कमी पडू देणार नसल्याचे सांगत त्यांनी आम्ही देखील वारकरी असून वारकऱ्यांच्या हितासाठी हे सरकार कायमच तत्पर असल्याचे त्यांनी आश्वासन दिले. याप्रसंगी सार्थ ज्ञानेश्वरीचे ऑडिओ बुक प्रकाशन करण्यात आले.

यावेळी जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, विधान परिषद उपसभापती नीलम गोऱ्हे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, बाबाजी काळे, बापूसाहेब पठारे, देवेंद्र कुटे, उमा खापरे, देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज कबीर, विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील,विश्वस्त ॲड. रोहिणी पवार, प्रमुख व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर व इतर भाविक,ग्रामस्थ,मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान कलशारोहनप्रसंगी मंदिराच्या देऊळवाड्याच्या मुख्य महाद्वार व नगारखाना खोलीचे जिर्णोध्दार कामाचा पूजन करत शुभारंभ करण्यात आला. गोकुळाष्टमी व माऊलींच्या जन्मोत्सवानिमित्त सायंकाळी सहा ते नऊच्या सुमारास माऊलींचा मुखवटा लाकडी रथात ठेवून रथोत्सव साजरा करण्यात आला. रात्री दहा ते बाराच्या सुमारास मंदिरात मोझे यांचे वतीने ह.भ.प. शरद महाराज बंड यांचे श्रीकृष्ण जन्म व संत ज्ञानेश्वर महाराज जन्मोत्सवाचे किर्तन पार पडले. यावेळी समाधीवर आरती घेत पुष्पवृष्टी करण्यात आली.

# आउटलुक आयकेअर रँकिंगमध्ये विद्यापीठ देशात तिसरे

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला 1 हजारपैकी 928.43 गुण; कोलकाता विद्यापीठाला 928.49 गुण

**पुणे | प्रतिनिधी**

आउटलुक आयकेअर रँकिंग 2025 मध्ये राज्य सार्वजनिक विद्यापीठ प्रवर्गामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने देशात तिसरा क्रमांक पटकावला आहे. त्यात पश्चिम बंगाल येथील जाधवपूर विद्यापीठ पहिल्या क्रमांकावर असून, कोलकाता विद्यापीठ दुसऱ्या क्रमांकावर आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला 1 हजारपैकी 928.43 गुण मिळाले असून, कोलकाता विद्यापीठाला 928.49 गुण मिळाले आहेत, तर पहिल्या क्रमांकावरील जाधवपूर विद्यापीठाने 929.7 गुण मिळविले आहेत.



ॲकॅडमी रिसर्च अँड एक्सलन्समध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला 400 पैकी 386.98 गुण, इंडस्ट्री इंटरफेस अँड प्लेसमेंटमध्ये 200 पैकी 192.2 गुण, तर इन्फ्रास्ट्रक्चर अँड फॅसिलिटीमध्ये 150 पैकी 136.43 गुण मिळाले आहेत.

आउटलुकतर्फे नुकतीच देशभरातील 75 टॉप सार्वजनिक राज्य विद्यापीठांची यादी जाहीर करण्यात आली. त्यात महाराष्ट्रातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ 3 क्रमांकावर असून, मुंबई विद्यापीठ 26 व्या क्रमांकावर, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ 28 व्या क्रमांकावर आहे. कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ

**40 व्या क्रमांकावर असून, उत्तर**

महाराष्ट्र विद्यापीठ 46 व्या क्रमांकावर आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ 52 व्या क्रमांकावर असून, गोंडवाना विद्यापीठ 75 व्या क्रमांकावर आहे.

> रँकिंगमध्ये तिसऱ्या क्रमांकाचे सर्वोत्कृष्ट राज्य सार्वजनिक विद्यापीठ म्हणून गौरव होणे, ही आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि सन्मानाची बाब आहे. हे यश आमच्या प्राध्यापक, होतकरू विद्यार्थी आणि समर्पित कर्मचाऱ्यांच्या एकत्रित कठोर परिश्रमाचे द्योतक आहे. आम्ही शिक्षण आणि संशोधनाचे दीपस्तंभ म्हणून विद्यापीठाचा वारसा पुढे नेत, यापुढेही यशाची नवी शिखरे गाठण्याचा प्रयत्न करीत राहू.
>
> **- डॉ. सुरेश गोसावी, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

> तिसऱ्या क्रमांकाचे रँकिंग हे उल्लेखनीय आहे. शैक्षणिक आणि संशोधनातील उत्कृष्टतेचा आमचा अथक प्रयत्न आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या आमच्या प्राध्यापकांच्या समर्पणाचे, संशोधकांच्या नावीन्यपूर्ण वृत्तीचे आणि एसपीपीयू परिवारातील प्रत्येक सदस्याच्या कठोर परिश्रमाचे हे स्पष्ट प्रतिबिंब आहे. शैक्षणिक कार्यक्रम सतत प्रगत करीत, औद्योगिक भागीदारी मजबूत करीत आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण वातावरण उपलब्ध करून देत या यशावर अधिक प्रगती साधण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> **- डॉ. पराग काळकर, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

# शंकांच्या निरसनानंतरच टीपी स्कीमची प्रक्रिया

## टीपी स्कीममुळे 6.8 किलोमीटर लांबीचा रिंगरोडचेही विकसन करता येणार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) हद्दीतील नगर रचना योजनांसाठी भूसंपादन करण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्याचा आणि सहमती मिळाल्यानंतर पुढील प्रक्रिया राबविण्याचा निर्णय पीएमआरडीए प्रशासनाने घेतला आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) तयार केलेल्या चार नगर रचना योजनांना (टाऊन प्लॅनिंग स्कीम-टीपी) राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे पीएमआरडीएच्या हद्दीतील गावालगतच्या विकासाला गती मिळणार असून, टीपी स्कीममुळे ६.८ किलोमीटर लांबीचा रिंगरोडचेही विकसन करता येणार आहे. हा रिंग रोडसाठी ६५ मीटर रुंद बाह्यवळण रस्त्यांचे क्षेत्र ताब्यात घ्यावे लागणार आहे. त्यानुसार धामणे, गोदुंबरे, दारूंबरे, साळुंब्रे, सांगवडे या गावांमधील प्रस्तावित नगर रचना योजनेबाबतच्या तरतुदींची माहिती देणे, धोरणात्मक बाबी समजावून सांगणे, नगर रचना योजनेच्या इराद्याबाबत, क्षेत्राबाबत तसेच नकाशाबाबत माहिती देण्यासाठी पीएमआरडीएच्या कार्यालयात शेतकऱ्यांची बैठक झाली.

नगररचना विभागाच्या सह महानगर नियोजनकार श्वेता पाटील यांनी सादरीकरणाद्वारे शेतकऱ्यांना टीपी स्कीमबद्दल माहिती दिली. तसेच योजनेची रूपरेषा आणि योजनेची अंमलबजावणीबाबतही सादरीकरण करण्यात आले. या बैठकीला आमदार सुनील शेळके, अतिरिक्त महानगर आयुक्त दीपक सिंगला, विकास परवानगी आणि नियोजन विभागाचे संचालक अविनाश पाटील यांच्यासह अधिकारी कर्मचारी आणि शेतकरी उपस्थित होते. या योजनेमध्ये कुठल्याही शेतकऱ्यांचे भूसंपादन करण्यापूर्वी त्यांच्या शंकांचे निरसन आणि समन्वयातूनच पुढील प्रक्रिया राबवणार असल्याची ग्वाही महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिली.

वाहतूक कोंडी सोडवण्याच्या अनुषंगाने शासनाकडून टप्पाटप्प्याने टीपी स्कीम मंजूर होत आहे. याची अंमलबजावणी पीएमआरडीएच्या माध्यमातून सुरू असून मावळ तालुक्यातील धामणे, गोदुंबरे, दारुंबरे-साळुंब्रे, दारुंबरे-साळुंब्रे, सांगवडे, नेरे आदी गाव परिसरात या योजनेची आखणी करण्यात येत आहे. त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन त्यांच्या संमतीशिवाय करणार नाही. तसेच शंकांचे पूर्णपणे निरसन झाल्याशिवाय तसेच समन्वयाशिवाय कुठलाही शेतकऱ्यांचे जमिनीचे भूसंपादन होणार नाही, असे डॉ. म्हसे यांनी जाहीर केले. बाधित होणाऱ्या सर्व शेतकऱ्यांची संमती घेऊनच पुढील प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

आमदार सुनील शेळके यांनी संबंधित टीपी स्कीम राबवताना कुठल्याही शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही, याची काळजी प्रशासनाने घ्यावी अशी सूचना केली. याशिवाय समन्वय आणि शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्यानंतरच भूसंपादन प्रक्रियेसाठी पुढे यावे. या टीपी स्कीम योजनेची आखणी निर्धारित वेळेत कशी करता येईल, शेतकऱ्यांना अपेक्षित मोबदला देण्यासंदर्भात तातडीने शासनाकडे पाठपुरावा करणे आवश्यक असल्याचे शेळके यांनी सांगितले.

### पंधरा नव्या टीपी स्कीमसाठी सूचना जाहीर

**» पीएमआरडीए अंतर्गत ६५ मीटर रुंद वळण रस्त्याचे क्षेत्र मिळविण्यासाठी एकूण १५ टीपी स्कीम घोषित करण्याबाबतची सूचनाही जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये वाघोली, आव्हाळवाडी, मांजरी खुर्द-१ आणि मांजरी खुर्द-२, मांजरी खुर्द-३, हवेली तालुक्यातील वडकी, मुळशी तालुक्यातील माण, धामणे, गोदुंबरे, दारुंबरे- साळुंब्रे १ दारुंबरे-साळुब्रे-२, सांगवडे, नेरे, बावधन बुद्रुक या गावातील नगर योजनांचा समावेश आहे.**

# बारामतीच्या जिरायती भागातील केळी आखाती देशात

## बारामतीच्या सातव कुटुंबीयांचा अवर्षणग्रस्त भागाला दिशा देणारा प्रयोग



**पुणे | प्रतिनिधी**

उसासाठी प्रसिद्ध असलेल्या बारामती तालुक्यातील शेतकरी आता केळीसारख्या नगदी पिकाकडेही वळत आहेत. परंतु, बारामतीच्या सातव कुटुंबीयांनी तालुक्याच्या जिरायती भागात निर्यातक्षम केळी लागवड प्रयोग यशस्वी केला. यातून त्यांनी शेतकऱ्यांना शेतीची वेगळी वाट दाखवली आहे. त्यांच्या शेतातील केळीची आता आखाती देशात निर्यात सुरू झाली आहे.

23 महिन्यांत केळी पिकांची दोन उत्पादने घेणे शक्य असल्याने ऊसशेतीच्या तुलनेने केळीकडे कल वाढण्याचे संकेत आहेत. माजी नगराध्यक्ष सदाशिव सातव, माजी नगराध्यक्षा जयश्री सातव, त्यांचे थोरले पुत्र आणि बारामती बँकेचे अध्यक्ष सचिन सातव, तसेच त्यांचे धाकटे पुत्र आणि माळेगाव कारखान्याचे संचालक नितीन सातव यांनी ही किमया साधली आहे.

सातव कुटुंबाची तालुक्यातील कोळोळी येथे शेती आहे. गतवर्षी गौरी आगमनाच्या दिवशी त्यांनी तेथे पाच एकर क्षेत्रावर केळी लागवड केली होती. यामध्ये एकरी 1250 केळीच्या झाडांची 7 बाय 5 अंतरावर लागवड करण्यात आली. त्यांनतर निर्यातक्षम केळी उत्पादन घेता यावे यासाठी त्यांनी प्रयोगशील शेतकऱ्यांच्या शेतात जात मार्गदर्शन घेतले. ठिबक सिंचनाचा वापर करत खत व्यवस्थापन साधले.

सोलापूर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये केळी पिकामुळे झालेली क्रांती बघून प्रेरणा मिळाली. शेतात आम्ही सुरवातीला पपई, जांभुळसह विविध फळपिकांच्या लागवडीचे यशस्वी प्रयोग केले. आज आमच्या केळीची निर्यात झाल्यानंतर आई- वडिलांनी केलेल्या कष्टाचे चीज झाल्याचे मनापासून समाधान आहे, अशी भावना सचिन सातव यांनी व्यक्त केली.

क्रॉप रोटेशन म्हणून केळी हा चांगला पर्याय बारामती तालुक्यामध्ये ऊस लागण, खोडवा व त्यानंतर क्रॉप रोटेशन म्हणून केळी हा चांगला पर्याय पुढे येत आहे. केळी पीक घेतल्यानंतर जमिनीचा पोत चांगल्या पद्धतीने सुधारतो. परिणामी, त्यामध्ये घेतलेल्या ऊसपिकाचे उत्पन्न चांगले येत आहे.

पणदरेपासून सुरू झालेली केळी शेती ही आता निरावागजसह दुष्काळी पट्ट्यामध्ये जळगाव सुपे परिसरातसुद्धा पोहचली आहे. दिवसेंदिवस केळीचे क्षेत्र वाढत असल्याचे सचिन सातव यांनी सांगितले. पाणी व्यवस्थापन केल्यास जिरायती भागात देखील केळीसारखे नगदी पीक लागवड करणे शक्य असल्याचे सातव म्हणाले.